

# कॉमर्स मध्ये करिअर करायचंय?

## कॉमर्स: करिअरच्या असंख्य संधींची खाण!

PPA

शैक्षणिक जीवनातला पहिला आणि महत्वाचा टप्पा म्हणजे दहावी ची परीक्षा! दहावीचं वर्ष किंवा बोर्डाची परीक्षा जवळ आली कि विद्यार्थी आणि पालक दोघेही उत्तम करिअर घडवण्यासाठी भरपूर अभ्यास  करू लागतात. शैक्षणिक अभ्यासाबरोबर ह्या वेळेस करावा लागतो तो म्हणजे "१०वी नंतर काय?" ह्या विषयाचा अभ्यास! दहावी नंतर कोणती स्ट्रीम निवडावी, का निवडावी आणि त्यासाठी उत्तम कॉलेजेस कोणती? बरं गावात नसेल तर नजीकच्या शहरातली चांगली कॉलेजेस कोणती? मग अकरावीला क्लासेस जॉईन करायची गरज आहे काय? कॉमर्स घेतले तर पुढे काय? सायन्स घेतले तर पुढे काय? अश्या असंख्य प्रश्नांनी भेडसावलेल्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन करावे म्हणून नाशिक मधल्या आमच्या Panchakshari's Professional Academy ने तुम्हाला दिलीएत काही नेहेमीच विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे थोडक्यात...

ही उत्तरं वाचून आपणास माहिती तर मिळेलच परंतु काही नवीन प्रश्नही पडतील. मग काय बिनधास्त संपर्क करा दिलेल्या क्रमांकावर आणि PPA च्या कॉमर्स एक्स्पर्ट कडून समजावून घ्या यातील बारकावे!

## १) १. हे कॉमर्स (वाणिज्य) म्हणजे नक्की आहे काय?

आपण जर Dictionary Definition बघितली तर कॉमर्स (वाणिज्य) या शब्दाचा अर्थ आहे "व्यवहार"!   अगदी १ रुपयाच्या सुईपासून तर २,००० कोटींच्या विमानांपर्यंत काहीही विकत घ्या किंवा विका, तो एक व्यवहारच असतो! म्हणजेच जिथे व्यवहार तिथे कॉमर्स! त्यामुळे आज आपण नजर टाकू तिथे आपणास व्यवहार दिसू शकतो. आपण घेतलेल्या २ रुपयांच्या पेन पासून तर २००० अब्ज रुपयांची विमाने आपल्या देशासाठी घेणं असो हा एक व्यवहारच आहे.

## २) कॉमर्स शाखेतील लोक नक्की करतात काय?

कॉमर्स शाखेतून बाहेर पडणारे लोक हे वेगवेगळ्या प्रकारे जगाला आणि व्यवहाराला मदत करत असतात. उदाहरणार्थ एका कंपनीला अकौंटिंगसाठी सीएची गरज आहे. सीए हा प्रॉफिट किंवा लॉस शोधण्यासाठी accounting तसेच नक्की किती कर भरायचा आहे हे शोधण्यासाठी Taxation करतो.

कोणत्याही कंपनीला बऱ्याच कायद्याचे पालन करणे गरजेचे असते. हा सर्व बाबतीत कंपनी सेक्रेटरी (CS) ची गरज असते.

प्रत्येक BUSINESS ला खर्च कमी करणे आणि त्यावर लगाम ठेवणे गरजेचे असते.  खर्चाच्या (cost) बाबतीत कॉस्ट अकाउंटंट (CMA) आपणास मदत करतो.
याचप्रकारे आस्थापना (management) साठी MBA  असे कॉमर्स मधील विविध लोक गरजेचे असतात.

## ३) कॉमर्स शाखेत करियरच्या संधी नक्की काय काय आहेत ?

वाणिज्य शाखा ही असंख्य संधींची खाणच आहे!
आपणास Accounting, Taxation मध्ये आवड असल्यास CA करियर हा एक उत्तम पर्याय आहे. अकरावी पासूनच सीए ची तयारी सुरू होते. यामध्ये Foundation, Intermediate आणि Final अशा ३ परीक्षा असतात.

कॉस्ट अकाउंटंट (CMA) होण्यासाठीही अशाच ३ परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे.

जर आपणास कायद्याच्या कामांमध्ये आवड असल्यास कंपनी सेक्रेटरी हा कोर्स उत्तम आहे. यामध्येही CSEET, EXECUTIVE आणि PROFESSIONAL अशा ३ परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे.
सीए, सीएमए आणि सीएस या तीनही परीक्षा कॉमर्स Graduation करत असताना देता येतात.
याशिवाय वकील होण्यासाठी बारावी कॉमर्स नंतर ५ वर्षाचे BSL LLB किंवा MBA ची आवड असल्यास बारावी नंतर BBA करता येते तसेच बँकिंगच्या तसेच MPSC, UPSC या सर्व परीक्षा वाणिज्य शाखेतून देता येतात.
अशा प्रकारे वाणिज्य क्षेत्र अगणित संधी आपणासाठी वाढून ठेवल्या आहेत!

## ४) कॉमर्स मधील संधी दिवसेंदिवस कशा वाढत आहेत?

जसजसा व्यवहार वाढत जातोय तसतसे कॉमर्सचे महत्व वाढत आहे! फक्त गावागावात होणारे व्यवहार आता जगातील देशांमध्ये होत आहेत, देशांच्या सीमाही व्यवहाराला थांबवू शकत नाहीत त्यामुळे कॉमर्स मधील विद्यार्थ्यांना नवनवीन संधी निर्माण होत आहेत!
पूर्वी एकाच गावात बारा बलुतेदार पद्धती होती जिच्यात व्यवहार वस्तू देण्याघेण्यातून होत असत. हळूहळू चलन अस्तित्वात आले आणि मग व्यवहाराची कक्षा वाढत गेली. गावापासून सुरू झालेले व्यवहार जिल्हा, तालुका, राज्य अन देशाच्या सीमा ओलांडून मोठा होत गेला आणि त्याचमुळे वाणिज्य शाखेचे महत्वही!

## ५) आजच्या बदलत्या जगात कॉमर्सचे महत्व कसे  वाढत जाईल?

जागतिकीकरण झाल्यानंतर आज भारतातील वाणिज्य पदवीधर कोणत्याही देशात जाऊन नोकरी अथवा व्यवसाय करू शकतो. आता हेच पहा, भारतातून गेलेला  VAT (Value Added Tax) आता दुबई मध्ये सुरू झाला अन भारतातील टॅक्स consultant आणि सीए ना नविन संधी निर्माण झाल्या! त्यामुळे हे जग वाणिज्य शाखेसाठी नवनवीन संधी निर्माण करत आहे.

## ६) आम्ही असं ऐकलं आहे की वाणिज्य शाखेत फक्त सीए, सीएस, सीएमए हेच करियर आहेत, हे कितपत खरं आहे?

हे अगदीच खरं आहे असं नाही म्हणता येणार! सीए, सीएस, सीएमए हे जरी महत्वाचे करियर असले तरी MBA, LLB, Actuary, MPSC/UPSC, Banking , DTL, DBM असे अनेकविध करियर ऑपशन्स आहेतच की!

## ७) आज वाणिज्य क्षेत्रात प्रवेश करणारी आमची मुले ५-६ वर्षात कुठे पोहोचले असतील?

माझ्या मते अजून अफाट संधी वाणिज्य शाखेकडे वेगाने सरकत आहेत त्यामुळे जर पुढील ५ वर्षे नीट invest केले आणि योग्य दिशा मिळवून प्रयत्न केले तर एक समाधानी आणि उत्तम आर्थिक मोबदला तसेच सन्मान देणारे करियर घडू शकते!

## ८) नवनवीन सॉफ्टवेअर्स मुळे कॉमर्स प्रोफेशनल्स ची किंमत कमी तर होणार नाही?

कोणतेही सॉफ्टवेअर व सिस्टिम हे नेहमी दुय्यम आणि मदतीसाठी उपयुक्त असते! ते काही मानवाच्या बुद्धिमत्तेला रिप्लेस करू शकत नाही. इथे प्रत्यक्ष क्लायंट हा वेगवेगळे प्रश्न घेऊन येत असतो त्यामुळे मानवी बुद्धीला तोड असू शकत नाही उलटून योग्य ठिकाणी ही बुद्धी काम करू शकते.

## ९) वाणिज्य शाखेतील प्रोफेशनल डिग्री म्हणजे नक्की काय?

सीए, सीएमए, सीएस या पदव्यांना प्रोफेशनल डिग्री असे म्हणतात कारण येथे ज्ञानाबरोबरच पदवी पण असणे गरजेचे आहे जी सीए, सीएमए, सीएस इन्स्टिटयूट कडून मिळते!

## १०) आमच्या पाल्याने दहावीची परीक्षा दिली आहे तर आम्ही आता पुढे नक्की काय करायला हवं?

कोणतेही करियर निवडतांना त्या क्षेत्रातील जाणकार आणि अनुभवी व्यक्तींचा सल्ला नक्कीच घ्यायला हवा. विध्यार्थ्यांना ज्या क्षेत्रात करिअर करायचे आहे त्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींशी त्यांच्या कामाचे स्वरूप कसे असते, त्यासाठी किती मेहेनत घेणे गरजेचे आहे, त्या क्षेत्रात उत्तम करिअर घडवण्यासाठी किती आणि कश्याप्रकारे अभ्यास करण्याची गरज आहे, चांगली कॉलेजेस कोणती, त्या क्षेत्रात शिक्षणासाठी येणारा साधारण खर्च किती, वगैरे प्रश्नांवर नक्कीच मार्गदर्शन घ्यावे. किंवा वाणिज्य क्षेत्रातील कोणतीही माहिती किंवा असणाऱ्या कोणत्याही प्रश्नही उत्तरे हवी असल्यास आपण आमच्या दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करू शकता!

## थोडेसे आमच्याबद्दल:

PPA (पंचाक्षरीज प्रोफेशनल अकॅडमी) ही नासिक येथील कॉमर्स क्षेत्रातील सुप्रसिद्ध आणि अग्रगण्य संस्था आहे. अकॅडमीचे Managing Director सीए योगेश पंचाक्षरी, Director मोनाली पंचाक्षरी आणि समस्त टीम गेल्या १८ वर्षांपासून सीए, सीएस, सीएमए तसेच एकरावी ते TY B. Com या सर्व परीक्षांसाठी उत्कृष्ट मार्गदर्शन करत आहेत. या काळात अकॅडमी मधून २०० पेक्षा जास्त सीए, सीएस आणि सीएमए पूर्ण झाले आहेत. अकरावी बारावीत सर्वोत्तम निकालाची परंपरा अकॅडमीने राखली आहेच. दरवर्षी ३५० ते ४०० विद्यार्थी वेगवेगळ्या कोर्सेस साठी अकॅडमीमध्ये प्रवेश घेतात आणि उत्तम ज्ञान आणि संस्कारांचे धडे घेत आपल्या स्वप्नाकडे वाटचाल करतात. स्वतः योगेश पंचाक्षरी सर हे सीए, सीएमए तसेच CIMA (इंग्लंड) या परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी आजपर्यंत "जागर कॉमर्सचा" या सदराखाली विद्यार्थ्यांना करियरची दिशा दाखविण्यासाठी ३०० हुन अधिक व्याख्याने घेतली असून जवळजवळ १०,००० विद्यार्थ्यांना करियरसाठी मार्गदर्शन केले आहे.
सरांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांवर दोन पुस्तकेही लिहिली आहेत. नासिक बाहेरील विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे यासाठी DiGi PPA अंतर्गत डिजिटल प्लॅटफॉर्मवरही क्लासेस घेतले जातात. प्रत्येक विद्यार्थी महत्वाचा आणि ज्ञानाचा प्रत्येक कंगोरा अमूल्य आहे असे मानून ज्ञानाधिष्ठित शिक्षण पद्धती हे PPA च्या यशाचं गमक आहे जे विद्यार्थ्यांच्या उत्तम निकालातून ठळकपणे दिसून येते. प्रत्येक विषयाच्या भरपूर सराव परीक्षा, विद्यार्थ्यांचे स्पेशल कौंसेलिंग यामुळे PPA तील विद्यार्थी नेहमीच लढाई साठी तयार असतात. शिरपेचात मानाचा तुरा म्हणजे सीए योगेश पंचाक्षरी सरांना PCCDA, नासिक तर्फे "सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार" प्राप्त झाला आहे तसेच PPA ला दैनिक भास्कर ग्रुप तर्फे "BEST COMMERCE ACADEMY" पुरस्कार मिळाला आहे.

## ॲकेडमीची वैशिष्ट्ये:

- १८ वर्षांची यशस्वी वाटचाल
- १०,०००+ विद्यार्थ्यांचा विश्वास
- वाणिज्य क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ मार्गदर्शक
- प्रत्येक विषयाचे सखोल मार्गदर्शन
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर
- नियमित सराव परीक्षा

## ॲकेडमीतर्फे चालविण्यात येणाऱ्या बॅचेस:

- 11th Commerce
- 12th Commerce
- FY, SY, TY B. Com
- CA: Foundation , Intermediate, Final
- CMA: Foundation , Intermediate, Final
- CS: CSEET, Executive, Professional
- BBA: 1st, 2nd & 3rd Year

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी Bank Visit, Industrial Visit, Share Market Visit, Personality Development Workshops असे अनेकविध उपक्रम राबवले जातात. याचबरोबर वाणिज्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या खास मुलाखती आणि व्याख्याने आयोजित करून विद्यार्थ्यांच्या विचारांची उंची वाढवण्याचे विशेष प्रयत्न PPA ची टीम सतत करत असते.

"यशस्वी माणसे आयुष्यात कायमच स्वतःशी स्पर्धा करतांना दिसतात कारण स्वतःच्या कामात सुधारणा हीच यशस्वी माणसाची स्पर्धेची व्याख्या असते."

कॉमर्स क्षेत्रात उत्तमोत्तम यश मिळवून यशाचे शिखर गाठण्यात **Panchakshari's Professional Academy** नेहेमीच तुमच्या सोबत आहे. कॉमर्स क्षेत्रातील करियर विषयीच्या तुमच्या सर्व प्रश्नांचे किंवा शंकांचे निरसन करतांना मला आणि टीम PPA ला नेहेमीच आनंद वाटेल!

-सी ए योगेश पंचाक्षरी


८२३७ २१८ २१८, ८६९८ २१८ २१८

www.ppa.org.in